**विषय :-** महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षण विभागात व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना व महानगरपालिकेत ठोक वेतनावर कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांना दिवाळी सन सानुग्रह अनुदान अदा करणेकामी होणा-या आर्थिक खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ :-** मा.प्रशासक तथा आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार दि.१०/१०/२०२४, रोजी दु.०२.३० वाजता महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याकामी विविध संघटनांचे प्रतिनिधींची बैठक संपन्न झालेली आहे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये मा.प्रशासक तथा आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत गुरुवार दि.१०/१०/२०२४, रोजी दु.०२.३० वाजता मा.प्रशासक तथा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, उप-आयुक्त (मुख्यालय) व संबधीत अधिकारी व कर्मचा-यां समवेत विविध संघटनांचे प्रतिनिधींची बैठक संपन्न झालेली आहे.

उक्त बैठकीध्ये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील, प्राथमिक शिक्षण विभागातील व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत सुमारे ४१२८ अधिकारी व कर्मचा-यांना रुपये १४,२००/- ( अक्षरी चौदा हजार दोनशे रुपये मात्र) सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असून त्याअनुषंगाने सदर अधिकारी व कर्मचा-यांना दिवाळी सणापुर्वी सन-२०२४/२५ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार सन-२०२३/२४ या वित्तीय वर्षासाठी रुपये १४,२००/- ( अक्षरी चौदा हजार दोनशे रुपये मात्र) खालील अटी व शर्तीनुसार सानुग्रह अनुदान अदा करणेकामी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षण विभागात व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवा सन-२०२३/२४ मध्ये एक वर्षापेक्षा कमी मात्र ६ महिन्यापेक्षा जास्त असल्यास सदर कर्मचा-यांना उक्त प्रमाणे सानुग्रह अनुदानाची रक्कम देय राहील, मात्र सदर वित्तीय वर्षात ६ महिन्यापेक्षा कमी सेवा असलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देय असणार नाही.

२. सन-२०२३/२४ या वित्तीय वर्षात संपुर्ण वर्ष निलंबीत असलेला कर्मचारी हा सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र असणार नाही. तथापि, निलंबीत कर्मचारी यांचा निलंबन कालावधी हा एक वर्षापेक्षा कमी असल्यास अथवा ज्या निलंबित कर्मचा-यांना महानगरपालिकेने हजर करून घेतलेले आहे. अशा कर्मचा-यांना हजर दिनांकापासून कर्तव्य सेवा कालावधी १८० दिवस वा जास्त असल्यास त्यांना सदर रक्कम देय राहील.

३. सन-२०२३-२०२४ या वित्तीय वर्षात शिस्तभंग विषयक कारवाईत दंड लावण्यात आलेल्या, वेतनवाढी रोखलेल्या किंवा गंभीर शिक्षा झालेल्या कर्मचाऱ्यांना सदर सानुग्रह अनुदान रक्कम देय असणार नाही.

४. महागरपालिकेमध्ये कार्यरत असलेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, प्राथमिक शिक्षण विभागामध्ये व माध्यमिक शिक्षण विभागामध्ये कार्यरत असलेले रुपये ४,८०० (s-१७) व त्यापेक्षा जास्त ग्रेड वेतन असणाऱ्या कर्मचा-यांना सदर सानुग्रह अनुदान रक्कम देय असणार नाही.

५. त्याचप्रमाणे १.महानगरपालिकेमध्ये ठोक वेतनावर तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचा-यांना, २.वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत कार्यरत आशा वर्कर, एन.यु.एच.एम., राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रम, राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत कार्यरत कर्मचा-यांना, आरोग्य सेविका (फायनन्स) कर्मचा-यांना ३.पर्यावरण विभागात कार्यरत असलेले पर्यावरण निरिक्षक व क्षेत्रसहाय्यक कर्मचा-यांना, ४.एन.यु.एल.एम.विभाग येथे कार्यरत असलेले व्यवस्थापक व समुह संघटक कर्मचा-यांना, ५.विधी विभागाअंतर्गत कार्यरत असलेले सहाय्यक विधी अधिकारी कर्मचा-यांना, ६.प्राथमिक शिक्षण विभागामध्ये समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत असलेले कर्मचा-यांना, ६.एल.बी.टी.विभागाअंगर्तत कार्यरत सेल्स टॅक्स इन्सेक्टर, ७. लेखापरिक्षण विभागाअंतर्गत कार्यरत सेवानिवृत्त लेखापरिक्षक तसचे ८.क्रिडा विभागाअंतर्गत कार्यरत सेवानिवृत्त क्रिडा अधिकारी इत्यादी सुमारे ४९६ कर्मचा-यांना प्रत्येकी रुपये १,०००/- (अक्षरी एक हजार मात्र) अदा करणेकामी प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षण विभागात व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर सुमारे ४१२८ कर्मचा-यांना रु.१४,२०० प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेकामी होणा-या अंदाजित खर्च रक्कम रुपये ५,८६,१७,६००/- तसेच उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या विविध विभागात एकत्रित ठोक वेतनावर कार्यरत सुमारे ४९६ कर्मचा-यांना प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेकामी होणा-या अंदाजित खर्च रक्कम रुपये ४,९६,०००/- याप्रमाणे एकुण अंदाजितक रक्कम रुपये ५,९१,१३,६००/- (रुपये पाच कोटी एक्क्यान्नव लाख तेरा हजार सहाशे रुपये मात्र) होणा-या खर्चास सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्रक्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१) तूरतुदीनुसार प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सविनय सादर.

**दिनांक** १४/१० /२०२४

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ६५५

उपरोक्त प्रस्तावितात्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षण विभागात व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर सुमारे ४१२८ कर्मचा-यांना रु.१४,२०० प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेकामी होणा-या अंदाजित खर्च रक्कम रुपये ५,८६,१७,६००/- तसेच उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या विविध विभागात एकत्रित ठोक वेतनावर कार्यरत सुमारे ४९६ कर्मचा-यांना प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेकामी होणा-या अंदाजित खर्च रक्कम रुपये ४,९६,०००/- याप्रमाणे एकुण अंदाजितक रक्कम रुपये ५,९१,१३,६००/- (रुपये पाच कोटी एक्क्यान्नव लाख तेरा हजार सहाशे रुपये मात्र) होणा-या खर्चास सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्रक्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१) तूरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मंजूर करण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना**

**विषय :- भिवंडी पुर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे.**
**(नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) योजने अंतर्गत)**

**मे.सादर,**

महानगरपालिका हद्दीतील भिवंडी पुर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट पोल लाईट बसविणे, कामी **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजने** अंतर्गत शासन निर्णय क्रमांक –संकीर्ण-2024/प्र.क्रं.37/ का. 1411 दि.1 जुलै 2024 नुसार वरिल कामी रुपये 50 लाख 100% राज्य शासनाच्या हिस्सा नुसार मंजुरी प्राप्त् झाली आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक रुपये.49,96,616/- तयार करण्यात आले होते. त्यास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे कडील आदेश जा.क्रं/जिनिस/नास्थास्वर्स/का-2/रा.वि/23-24/1634 दि.18/07/2024 नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामी दिनांक 30/08/2024 रोजी फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार महाटेंडर वर टेंडर क्रं.1075088 नुसार 1 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त् एकूण 1 निविदांची छानणी प्रक्रिया पुर्ण करुन प्राप्त एक निविदाकार यांचे प्राईज बिड दि.19/9/2024 रोजी उघडण्यात आले आहे. त्यानुसार निविदादरांचा तौलनिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं | निविदाधारकांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | प्राप्त दर % कमी/जास्त् | निविदा खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | मे.हायटेक कंस्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई | 49,96,616/- | 7.090% कमी | 46,42,356/- |

भिवंडी पुर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे कार्यान्वये करणे कामी प्राप्त 1 निविदा मे.हायटेक कंस्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.090% कमी दराची म्हणजेच 46,42,356/- खर्चाची होत आहे.

वरीलप्रमाणे सर्वात कमी दराचे निविदाकार मे.हायटेक कंस्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांनी सादर केलेले निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.090% कमी आहेत त्यास निविदा समिती तसेच मा.आयुक्त् सो. यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा मे.हायटेक कंस्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ.1949 चे कलम 73 (क) नुसार संविदा करणे तसेच आर्थिक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

ठराव क्रमांक : ६५६

दिनांक : १४/१०/२०२४

**विषय :- भिवंडी पुर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे. (नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) योजने अंतर्गत))**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रं.एमसीओ 2020/प्रक्र71(भाग-2)नवि-14 दिनांक 06/06/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-452(अ) तरतुदीनुसार शहर महानगरपालिका वरिल कामी प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्य् लेखा परिक्षक, मुख्य् लेखा व वित्त् अधिकारी, अतिरिक्त् आयुक्त् यांनी शिफारस केल्यानुसार **भिवंडी पुर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे व (नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) योजने अंतर्गत)** कार्यान्वित करणे कामी वरील प्राप्त निविदानुसार सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकानुसार 7.090 टक्के कमी दर असलेले निविदाकार मे.हायटेक कंस्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ.1949 चे कलम 73(क) नुसार निविदा संविदा करणे व त्यानुसारा येणा-या रक्क्म रुपये 49,96,616/- चे खर्चास आर्थिक मान्यता देत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**